# नंदुरबार जिल्हा परिषद महिला व बाल विकास विभागातील पर्यवेक्षिका संवर्गातील अनुशेषाची पदे भरण्यासाठीची जाहिरात

## (जाहिरात क्रमांक ०२/२०११) दि. १९/०९/२०११

शासन परिपत्रक क्रमांक एपीटी/२०११/ प्र.क्र २२४/आस्थापना-८ मंत्रालय मुंबई दि. ०८ ऑगस्ट २०११ व शासन परिपत्रक क्रमांक एपीटी-२०११/प्रक्र-२२४/आस्थापना-८, मंत्रालय, मुंबई दि. १६ऑगष्ट २०११, व शासन अन्वये विहित करुन देण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार जिल्हा परिषद, नंदुरबारचे अधिनस्त असलेल्या महिला व बाल विकास विभागांकडील पर्यवेक्षिका संवर्गातील गट-'क' ची रिक्त पदे खालील प्रमाणे भरावयाची आहेत. त्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील रिक्त पदावर अतिरिक्त संवर्ग कक्षाकडील कर्मचारी सामावून घेण्याची शासनाने अथवा मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी आदेश दिल्यास अथवा सामाजिक आरक्षणाची बिंदू नामावली नोंदवही / समांतर आरक्षणाची नोंदवही तपासणीअंती काही बदल झाल्यास त्यानुसार खालील रिक्त पदांमध्ये बदल होऊन त्याप्रमाणे भरती संबंधीची पदे भरण्याची कार्यवाही केली जाईल. (दिनांक ३०/०४/२०१२ अखेर रिक्त होणारी पदे विचारात घेऊन रिक्त पदाच्या सरळसेवा भरतीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.)

**भरावयाच्या पदांची नावे, संख्या व विगतवारी**

| पद क्रमांक | पदांचे नाव | अ. जा. | अ. ज. | वि. जा अ | भ. ज. ब | भ. ज. क | भ. ज. ड | वि मा प्र | इ मा व | खु ला | ए कू ण | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (अंगणवाडी सेविकेतून निवडीने ) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | अ.ज. सर्वसाधारण-१<br>इ.मा.व सर्वसाधारण-१ |
| २ | पर्यवेक्षिका जिल्ला तांत्रिक सेवा वर्ग-३ (सरळसेवा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ | इ.मा.व. सर्वसाधारण- २ |
| | | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ४ | |

## पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता :-

| अ. क्र. | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (अंगणवाडी सेविकेतून निवडीने ) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व अंगणवाडी सेविका /मदतनीस बालवाडी शिक्षिका अशी मिळून एकुण १० वर्षे सलग अर्हताकारी सेवा असणे आवश्यक आहे. |
| २ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (सरळसेवा ) | कला, विज्ञान, वाणिज्य, कृषी विधी,समाजकार्य, समाजशास्त्र, गृहविज्ञान, पोषण आहार किंवा त्यास समतुल्य म्हणून शासनाने घोषीत केलेली कोणतीही पदवी अर्हता धारण केलेली असावी. मान्यताप्राप्त विद्यापिठाची समाजकार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातक पदवी धारण करीत असलेल्या उमेदवाराना अग्रक्रम दिला जाईल. |

## विशेष सुचना :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं. प्रशासन २०००/प्र.क्रं. ५/२००१/३२,दि. २० जुले् २००२ व अनुषंगीक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमदेवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ , मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६ सेवा-४ दि. ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार दि. ०१ नोंव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल,

त्यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सद्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निवार्ह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.)

३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना मधील प्रकल्पामध्ये ज्या बालवाडी शिक्षिका/ अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना अंगणवाडी सेविका म्हणून सामावून घेतले आहे. अशा अंगणवाडी सेविकांचे दहा वर्षापेक्षा कमी नसेल इतकी सेवा करणा-या व **पंच्चावन्न** वर्षाहून अधिक वय नसणा-या अंगणवाडी सेविका नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्तीसाठी पात्र समजण्यात येतील.

## वयोमर्यादा :

अ) उमेदवाराचे वय दिनांक १९/०९/२०११ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ०५ वर्ष शिथिलक्षम राहील.

ब) याशिवाय प्रकल्पग्रस्त, अंपग, माजी सैनिक, खेळाडू व अंशकालीन कर्मचा-यांसाठी शासनाकडून वेळोवेळी निश्चित केल्यानुसार कमाल वयोमर्यादेमध्ये सूट अनूज्ञेय राहील.

राष्ट्रीयत्व - भारतीय.

**१) पदनिहाय वेतनश्रेणी :- (सहाव्या वेतन आयोगानुसार)**

| अ. क्र. | पदाचे नांव | मानधन |
|---|---|---|
| १ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (अंगणवाडी सेविकेमधून निवडीसाठी) ५०% | ९३००-३४८०० ग्रेड पे ४१००/- |
| २ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३(सरळसेवा) ५०% | ९३००-३४८०० ग्रेड पे ४१००/- |

**२) अर्ज कसा करावा ?**

**१)** सोबत दिलेल्या नमुन्यात ३० से.मी. X २० से.मी. आकाराच्या पांढ-या जाड कागदावर संगणकीकृत करुन अर्ज सादर करावा. त्यावर पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वत:चा फोटो (स्वत:ची स्वाक्षरी केलेला) अर्जावर घट्ट चिकटवावा.

**२)** अर्जाखाली दर्शविलेल्या अधिकारी यांच्या नांवाने खालील कार्यालयास अर्ज सादर करावा.

| अ. क्र. | पदनाम | अर्ज कोणाच्या नांवाने करावा | अर्ज सादर करावयाचे कार्यालयाचा संपुर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| १ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ | सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती, तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.वि.), जिल्हा परिषद, नंदुरबार | महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, प्रशासकीय इमारत, टोकरतलाव रोड नंदुरबार |

**३)** सदर अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक, प्रवेशपत्र वितरणाचा दिनांक, परीक्षेचा दिनांक खालीप्रमाणे आहे. पात्र उमेदवारांनी खालील दिलेल्या कालावधीमध्ये जिल्हा परिषद, नंदुरबार कार्यालयातील संबंधीत विभागाकडून प्रवेशपत्र प्रत्यक्ष घेऊन जावेत. **प्रवेशपत्र पोस्टाद्वारे पाठविले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

| अ. क्र. | पदनाम | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | प्रवेशपत्र वितरणाचा दिनांक | परीक्षेचा दिनांक | परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यवेक्षिका जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ | ०१/१०/२०११ | ७/१०/२०११ ते ८/१०/२०११ | ०९/१०/२०११ | स २.०० ते ३.०० |

**अर्ज करतांना उमेदवारास ज्या पदाकरिता अर्ज करावयाचा आहे, त्या पदाचे नांव व उमेदवाराच्या जातीचा प्रवर्ग याबाबतचा उल्लेख बंद पाकिटावर स्पष्टपणे नमुद करणे अत्यावश्यक आहे.**

१) अर्जदाराने अर्जासोबत खालील (लागु असलेल्या) प्रमाणपत्रांची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका-याने स्वाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. (सांक्षाकीत प्रती, केंद्र/राज्यशासनाचे राजपत्रीत अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनी सांक्षाकित केलेले असावे. तसे नसल्यास अथवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपुर्ण समजून नाकारला जाईल)

१) संबधीत पदाचे अनुषंगाने आवश्यक शैक्षणिक अर्हता परिक्षा उत्तीर्ण बाबतचे सर्व प्रमाणपत्र.

२) उमेदवार ज्या राखीव प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल, त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे बंधनकारक राहिल.

३) वय दर्शविणारे प्रमाणपत्र (जसे शाळा सोडल्याचा दाखला, शालांत परीक्षा प्रमाणपत्र)

४) महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचे डोमीसाइल (अधिवास ) प्रमाणपत्र.

५) ज्यांना लागु आहे (जसे अनु. जाती व जमाती वगळून अन्य सर्व मागास प्रवर्ग, महिला) अशा सर्व उमेदवारांच्या बाबतीत उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमिलेयर) प्रमाणपत्र दि. ३१ मार्च, २००९ अखेरचे वैध असलेले सादर करणे आवश्यक आहे.

६) माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे / जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे सेवा अभिलेख.

७) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत जोडला आहे.)

८) महिला, खेळाडू, अपंग, माजी सैनिक, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, इ. या समांतर आरक्षणाच्या पदांच्या बाबतीत आवश्यक ती सर्व संबंधीत कागदपत्रे / प्रमाणपत्रे.

य) अंशकालीन कर्मचा-यांना त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावे. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ प्रमाणे समांतर आरक्षण लागू राहील.

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दि. २७ ऑक्टोबर, २००९ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका जाहिरात देऊन संबंधीत पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

३) सर्व अटींची व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार संबंधीत पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

४) विहित अटी व शर्तीची पुर्तता करणा-या व तसेच विहित प्रवर्ग / वर्गवारी असणा-या उमेदवारांनीच अर्ज करावयाचे असून त्या व्यतिरिक्त असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५) चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबधीत उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही.

६) शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

७) एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

८) पोस्टाने पाठविलेला अर्ज वर दर्शविलेल्या अधिकारी (सबंधीत पदानुसार) यांचे नांवे दि. ०१/१०/२०११ रोजी साय ५.०० वाजे पर्यंत पोहोचतील या बेताने पाठवावे. नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. पोस्टाने पाठविलेला अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याशिवाय उमेदवार स्वत: पुर्ण भरलेला अर्ज वर दर्शविलेल्या कार्यालयात (संबंधीत पदानुसार) कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) समक्ष दाखल करु शकतील.

**९) अर्जासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा रेखांकित धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) नंदुरबार येथे देय असलेला मागास प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १००/- अर्जासोबत जोडावा. सदर शुल्क ना-परतावा राहील, ते कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. रेखांकित धनाकर्षाच्या मागे उमेदवाराचे संपुर्ण नांव, पत्ता व संवर्ग स्पष्टपणे नमुद करावा. तसेच सदर धनाकर्षाचा दिनांक व क्रमांक अर्जावर नमुद करणे अत्यावश्यक राहील.**

१०) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायांकित प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.

११) खालील प्रकारच्या उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील व याबाबत संबधीतांना कळविण्यात येणार नाही.

१) विहित नमुन्यात नसलेले अर्ज.
२) विहित पात्रता न धारण करणा-या उमेदवारांचे अर्ज.
३) अपुर्ण व चुकीची माहिती भरलेले अर्ज.
४) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.
५) स्वाक्षरी नसलेले अर्ज.
६) रेखांकित धनाकर्ष न जोडलेले अर्ज.
७) आवश्यक त्या सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज.
८) लहान कुटूंबीयांचे मुळ प्रतिज्ञापत्र नसलेले अर्ज.

१२) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या प्रवर्गाचे जातीचे विहित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१३) अर्ज छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल. सदर परीक्षेचा दर्जा सर्वसाधारणपणे संबंधीत पदाचे शैक्षणिक अर्हतेच्या अनुषंगाने असेल. तसेच लेखी परीक्षेला सर्वसाधारणपणे मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित, बौध्दिक चाचणी इ. या विषयावरील प्रश्न असु शकतील.

१४) पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा शासन परिपत्रक क्रमांक एपीटी-२००९/प्रक्र-३५२/आस्थापना-८, मंत्रालय, मुंबई दि. १७ डिसेंबर, २००९ अन्वये विहित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येईल. सदरचे शासन परिपत्रक आणि तसेच जिल्हा परिषदांमधील रिक्त पदे भरती संबंधीचे शासन आदेश (जसे प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, दर्जा इ. माहिती दर्शविणारे) महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. पात्र उमेदवारांनी त्यानुसार संबधीत दिवशी लेखी परीक्षेसाठी विहित वेळेच्या १ तास अगोदर परीक्षा केद्रावर उपस्थित राहावे. परीक्षा केंद्राविषयीची माहिती व लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पदनिहाय यादी नंदुरबार जिल्हा परिषदेच्या इमारतीच्या सूचना फलकावर लावली जाईल.

१५) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी निवड / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. व प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

१६) निवड झालेल्या उमेदवाराना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र / हमीपत्र इ. यांची पुर्तता करुन देणे आवश्यक राहील तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करुन घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणा-या उमेदवारांना संबंधीत नियमानुसार आवश्यक ती परीक्षा / प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

१७) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (मागासवर्गीयांसाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधील कलम ४ (३) नुसार विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल.

१८) उपरोक्त पदांसमोर नमुद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, किमान अर्हता व्यतिरिक्त उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवांचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांचा नियमातील तरतूदींच्या अनुषंगाने अंतिम निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल.

१९) पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी पर ीक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या किंवा समान गुण धारण करणा-या त्या-त्या संवर्ग/प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये ते धारण करीत असलेले उच्च/विशेष शैक्षणिक अर्हता/जाहिरातीतील नमुद प्रशिक्षण व अनुभव विचारात घेता मौखिक परीक्षेसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची यादी मर्यादीत केली जाईल. अशी यादी जिल्हा परिषदेत प्रसिध्द केली जाईल. याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

**२०) लेखी परिक्षा सरळ सेवेने भरती करीता २०० गुणांची लेखी व मुलाखतीचे २५ गुण अशी २२५ गुणांची राहील. अंगणवाडी सेविकेसाठी ७५ गुणांची लेखी व मुलाखत २५ अशी एकुण १०० गुणामधून गुणानुक्रमे नियमाचे अधिन राहून निवड करण्यात येईल.**

**२१) सेविकेतून भरावयाच्या पदाची लेखी परिक्षा वस्तूनिष्ठ स्वरुपाची व एकुण ७५ गुणांची राहील. प्रश्न, पोषण,आरोग्य, पुर्व शालेय शिक्षण, सामान्य ज्ञान, इ. आधारीत राहतील. लेखी परीक्षेत किमान ३५ गुण अंगणवाडी सेविकेन मिळविणे आवश्यक आहे.**

**२२) सेविका या पदासाठी अर्जा सोबत जोडावयाच्या अनुभवाचा दाखला बाल विका प्रकल्प अधिकारी, गट विकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने केलेला असावा. त्याच प्रमाणे १९ /०९/२०११ रोजी एकुण सेवा १० वर्ष पुर्ण होणे आवश्यक आहे.**

**२३) सदर पदास शासनाने विहीत केलेल्या समांतर आरक्षण लागू राहिल. (माजी सैनिकाचे वारस खेडाळू,भुकंप/ प्रकल्पग्रस्त ही पदे फक्त महिलांसाठीच असल्याने वेगळे समांतर आरक्षण लागू केले जाणार नाही.**

**२४) माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणामध्ये युध्दात /सैन्यातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकाच्या कुटूंबीयास (फक्त पात्र महिला सदस्य) प्राधान्य दिले जाईल.**

**२५) माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणामध्ये युध्दात /सैन्यातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकाच्या कुटूंबीयास (फक्त पात्र महिला सदस्य) प्राधान्य दिले जाईल.**

**२६) ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापुर्वीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.**

२७) परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण इ. बाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, नंदुरबार हे स्वतःकडे राखुन ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

२८) मुलाखतीच्या वेळी उमेदवाराने त्यांची मुळ शैक्षणिक, व्यावसायीक अर्हतेबाबतची व अनुभवाची कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा मुलाखतीस प्रवेश दिला जाणार नाही. व त्यांचा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

२९) समांतर आरक्षणाच्या पदांसाठी पात्र उमेदवारांची निवड करण्याची कार्यवाही/पदे भरण्याची कार्यवाही शासनाने वेळोवेळी दिलेल्या (प्रचलित) आदेशानुसार करण्यात येईल. समांतर आरक्षणाप्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारास निवडीसाठी प्राधान्य देण्यात येईल.

३०) सदर भरती प्रक्रिये संदर्भात जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

| सदस्य सचिव | सदस्य | अध्यक्ष |
|---|---|---|
| जिल्हा निवड समिती तथा उपमु.का.अ (बा.वि), जिल्हा परिषद,नंदुरबार | जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नंदुरबार | जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,नंदुरबार |

फक्त महिला उमेदवारासाठी

# अर्जाचा नमुना

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :-

| उमेदवाराने पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो स्वाक्षांकित करुन घट्ट लावावा. (स्टेपल अथवा पीन लावू नये) |
|---|

प्रति,

म. सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती
तथा ----------------------------
जिल्हा परिषद, नंदुरबार

विषय : पर्यवेक्षिका वर्ग -३ पदासाठी करावयाचा अर्ज-२०११ (सरळसेवा, अंगणवाडी सेविकेतून )

१) सुंपर्ण नांव (मराठीमध्ये) स्वत:चे नाव : --------------------------------------
वडिलांचे / पतीचे नाव : ---------------------------------------
आडनांव : ---------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता - घर क्रमांक --------------------------------------------------------
--------------------------------------------------------
गाव / शहर -------------------- पोस्ट -----------------------------
तालुका --------------------जिल्हा -----------------------------
पीन कोड -----------------------
दूरध्वनी (कोडसह) --------------------- भ्रमणध्वनी ---------------------

३) अर्जदार कोणत्या प्रवर्गाचा आहे (योग्य ठिकाणी √ अशी खुण करावी.)

अ) सामाजिक आरक्षण :-

| अनुसूचीत जाती | अनुसूचीत जमाती | विमुक्त जमाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

ब) समांतर आरक्षण :- (योग्य ठिकाणी √ अशी खुण करावी.)

| माजी सैनिक | महिला | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन कर्मचारी | अपंग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अल्पदृष्टी | कर्णबधीर | अस्थिव्यंग |
| | | | | | | | | |

४) अ) मागासवर्गीय असल्यास जातीचे प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-याचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक : --------------------------------------------------------------------

ब) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमिलेयर) प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-याचा हुद्दा, प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक ------------------------------------------------

क) जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले जातीचे वैधता प्रमाणपत्राचाक्रमांक व दिनांक ---
-------------------------------------------------------------------------

३) अ) अर्जदाराची जन्मतारीख अंकामध्ये (शाळा सोडल्याचे दाखल्याप्रमाणे तारीख)------------
ब) दि. /०९/२०११ रोजी उमेदवाराचे वय -------- वर्षे ------महिने ------ दिवस

४) सेवायोजन कार्यालय नोंदणी क्रमांक व दिनांक -------------------------------------------

५) अर्जदाराचा शैक्षणिक तथा आवश्यक अर्हतेविषयीचा तपशील (किमान शैक्षणिक अर्हतेसह)

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | शाळा, मंडळ, विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

६) अनुभव :-

| अ. क्र. | काम केलेल्या संस्थेचे नांव | संस्था शासनमान्य आहे अथवा नाही | धारण केलेले पद | नोकरीचा कालावधी | नोकरी सोडल्यास कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७) समांतर आरक्षणातील उमेदवारांचे प्रमाणपत्राविषयी तपशील.

| अ. क्र. | समांतर आरक्षण वर्गवारी | प्रमाणपत्राविषयी थोडक्यात तपशील | प्रमाणपत्र दिलेल्या प्राधिका-याचे पदनाम | प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

८) अर्जदार विवाहित आहे काय ? होय/नाही

९) महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? होय/नाही

१०) डिमांड ड्राप्टचा तपशील-राष्ट्रीयकृत बँकेचे नाव -------------------------------------------

शाखा ------------------------ तालुका ------------------- जिल्हा ------------------------

डि.डी. क्रमांक -------------------- दिनांक ----------------------- रु. -------------------

- अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) ----------------------------------------------------------------------------

२) ----------------------------------------------------------------------------

३) ----------------------------------------------------------------------------

४) ----------------------------------------------------------------------------

५) ----------------------------------------------------------------------------

६) ----------------------------------------------------------------------------

वर नमुद केलेला तपशील माझे माहितीप्रमाणे पूर्णपणे सत्य आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणीत करतो / करते की, मी वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द होणेस / नोकरी गमावण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस मी पात्र व बांधिल राहील. याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच शासनाचे आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच माझी नेमणूक करण्यात यावी.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना

## प्रतिज्ञापन

## नमुना अ

## (नियम ४ पहा)

मी श्री / श्रीमती /कुमारी -------------------------------------------------------------------

श्री ------------------------------------------------------------------------ यांचा /यांची/मुलगा/मुलगी / पत्नी वय --------- वर्षे, राहणार ----------------------------------------------- -------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी ----------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ----------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- इतकी आहे.

(असल्यास जन्मदिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्हत ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण:- ----------------**

**दिनांक:- / /२०११** **उमेदवाराची सही/-**

**(नांव)**